# प्रस्तावना

मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांमध्ये शिवाजी महाराजांच्या मोजक्या पत्रांचे स्थान लाख मोलाचे आहे. आजपर्यंत संशोधकांच्या परिश्रमाने महाराजांची सुमारे दोनशे पत्रे उपलब्ध झालेली आहेत. त्यांतील अनेक पत्रे नक्कल आहेत; तर काही अस्सल पत्रे आहेत. अर्थात अस्सल पत्रे याचा अर्थ शिवाजी महाराजांच्या हस्ताक्षराची पत्रे नव्हेत, तर त्यांच्या खास मुद्रांनी अंकित असलेली पत्रे होत.

शिवाजी महाराजांची नेमकी पत्रे कोणती त्याचे विवेचन करतांना शं.ना. जोशी लिहितात,' शिवाजीराजांची पत्रे म्हणजे शिवाजीराजांच्या हस्ताक्षरांची पत्रे असा अर्थ नाही; तर, शिवाजीराजांच्या कचेरीतून पत्र पाठविणारा म्हणून शिवाजीराजे हे नांव ज्या पत्रांत आहे, अर्थात त्यांच्या नावाने पाठविली गेलेली पत्रे ती.'१

मध्ययुगीन कालात पत्रलेखन हे सामान्यत: कचेरीतील लेखनिकाकडून होत असे. राजेरजवाड्यांप्रमाणे वतनदार जहागिरदारही लेखनिकांकडून पत्रे लिहून घेत असत. अशा पत्रांवर ''शिक्का'' आणि ''मोर्तब'' या दोन मुद्रा उमटवलेल्या असत. ''राजमुद्रा '' हा एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय असून अद्यापही तो दुर्लक्षित आहे. शं.ना. जोशी, भा. वा. भट यांसारखे काही संशोधक वगळल्यास राजमुद्रांचा काळजीपूर्वक अभ्यास विशेषत्वाने कोणी केलेला आढळत नाही. मुद्रांमुळे पत्रांचा अस्सलपणा आणि अधिकृतपणा सिध्द होतो, शिवाय पत्रकर्त्यांचे हुद्दे आणि वृत्ती समजण्यास मदत होते. शिवाजी महाराजांच्या पत्रांवरील मुद्रांच्या संदर्भात पुढे सविस्तर विवेचन करणार आहेच.

शिवाजी महाराजांच्या पत्रांचे प्रामुख्याने कचेरीपत्रे आणि खाजगी पत्रे असे दोन प्रकार मानले जातात. ह्या दोन प्रकारच्या पत्रांमध्ये कचेरीपत्रे संख्येने अधिक आहेत. कचेरीपत्रे नेमकी कोणती हे ठरवितांना साधारणपणे पत्राच्या प्रारंभी असलेला मायना विचारात घ्यावा लागतो. परंतु केवळ मायन्यावरून कचेरीपत्र ठरविणे इष्ट नसते.

पुष्कळवेळा पत्राच्या मजकुरावरून त्याचा समावेश कचेरीपत्रांत करावा लागतो. खाजगी पत्रे, विशेषत: राज्यकर्त्यांनी लिहिलेली खाजगी पत्रे तत्कालीन ऐतिहासिक घटनांच्या तपशीलावर पुष्कळवेळा अधिक प्रकाश टाकतात. विशेष म्हणजे शिवकालांत खाजगी पत्रे हा पत्रप्रकार अधिक ठळकपणे रूढ झालेला आढळतो. या संदर्भात शं. ना. जोशी लिहीतात,'खाजगी' पत्रे हा पत्रप्रकार शहाजी-शिवाजीपासूनच जितका व



जसा आढळतो तसा व त्या गुणाचा मुसलमानी अमदानीत आढळत नाही.'

पुढे मुसलमानी अमदानीतील पत्रप्रकारांचे विश्लेषण करून शं.ना. जोशी यांनी म्हटले आहे की,' मुसलमानी अंमलदारांच्या पत्रांत कचेरीपत्रे आणि खाजगी पत्रे असा भेद नाही. अशी पत्रे वा उल्लेख शहाजी-शिवाजीपासून सापडतात. काल बदलल्याची हीच खरी कसोटी आहे.'

शिवाजी महाराजांच्या कचेरीपत्रांमध्ये एक ठराविक पध्दतीचा मायना आढळतो. त्या मायन्यामध्ये पहिल्या अर्ध्या भागात पत्र कोणाकडून धाडले आहे ते स्पष्ट करून पुढील अर्ध्या भागांत पत्र कोणाला लिहिले ते स्पष्ट केलेले असते किंवा वेगळ्या शब्दांत सांगता येईल की 'कचेरी'. पत्रप्रकारामध्ये प्रथम पत्र पाठविणाऱ्याचे नांव असते; आणि पुढे ज्याला पत्र पाठविले त्या अधिकाऱ्याचा उल्लेख असतो. परंतु या अधिकाऱ्याच्या नावाचा उल्लेख नसतो. क्वचित मात्र ज्याला पत्र पाठविले त्या अधिकाऱ्याचा उल्लेख काही पत्रांतून आलेला आहे. उदा. कान्होजी जेधे यांचे नांव राजवाडे खंड १५ ले.३३४ मध्ये आलेले आहे. अर्थात् अशी पत्रे अपवादात्मक आढळतात.

शिवाजी महाराजांच्या कचेरीपत्रामध्ये प्रामुख्याने पुढील मायना आढळतो. 'अजरख्तखाने राजश्री शिवाजी राजे दामदौलत हुं' आणि पुढील अर्ध्या भागात 'बजानीबु कारकुनानी हाल व इस्तकबाल देखमुखानि'..........' अशा आशयाचा मजकूर येतो. अजरख्तखाने याचा अर्थ 'कचेरीपासून' असा असून 'दामदौलत हुं' याचा अर्थ' त्याचे राज्य चिरायू होवो असा होतो; तर 'बजानीबु' याचा अर्थ 'कडे' असा असून 'हाल' म्हणजे 'हल्लीचे' आणि 'इस्तकबाल' म्हणजे 'पुढे होणारे' - भावी असा आहे. अजरख्तखाने .... इत्यादी मजकूर असलेल्या पत्रांचे एक वैशिष्ट्य म्हणजे ही पत्रे कारकून या सरकारी अधिकाऱ्यांना उद्देशून लिहीलेली असून त्यांच्याबरोबर पाटील, देशमुख, देशकुलकर्णी इत्यादी वतनदार मंडळींचा उल्लेख असतो. परंतु सुभेदार किंवा हवालदार यांसारख्या अधिकाऱ्यांना उद्देशून पत्रे पाठविली जात नव्हती.

कचेरीपत्रांचे आणखी दोन प्रकार असून या प्रकारची पत्रे सुभेदार, हवालदार, सर-हवालदार, वाकनीस, जुमलेदार इत्यादी अधिकाऱ्यांना उद्देशून लिहीलेली असत. ह्याही पत्रांमधुन कारकुनांचा उल्लेख केलेला असे. या प्रकारासंबंधी पुढे चर्चा येईलच.

'अजरख्तखाने' पत्रप्रकारात आणखी काही पोटभेद मानलेले आहेत. उदा., अजरख्तखाना' या मायन्याचे पत्र जर कौलनामा असेल तर या पत्राच्या प्रारंभी

स्पष्टपणे 'कौंलुनामा' किंवा 'कौंलनामा' असा उल्लेख केलेला असे. 'कौलनामा' दोन प्रकारचे असून एखाद्या व्यक्तीला जर 'कौलनामा'पत्र पाठविले असेल तर त्यामध्ये त्या व्यक्तीच्या नावाचा उल्लेख असे. जर अनेकांना उद्देशून 'कौलनामा' पाठविला असेल तर त्यांच्या पदांच्या नावाचा उल्लेख केलेला असे. उदा. मोकदम, देशमुख इत्यादी.

'रख्तखाना' म्हणजे कचेरी, या संदर्भात मेस्तक-पुस्तकातून आणि राज्य-व्यवहारकोशासारख्या साधनग्रंथातून माहिती आलेली आढळते. त्यावरून रख्तखाना म्हणजे राज्यातील पत्रे जमाखर्च लिहीण्याची मुख्य कचेरी होय.

जमाखर्चाच्या पत्रव्यवहारांत 'तहवेल' आणि 'शाहीरू' असे दोन खर्चप्रकार आलेले आढळतात. तहवेल म्हणजे राजा आणि त्याचे कुटुंब यांच्यासाठी होणारा खर्च आणि शाहीरू म्हणजे राज्यातील अधिकारी मंडळींच्या वेतनासाठी होणारा खर्च. मेस्तक-पुस्तकांमध्ये तहवेल आणि शाहीरू यांचे उल्लेख आलेले आढळतात. तहवेल आणि शाहीरू खर्च कसा लिहावा याच्या सूचनाही मेस्तकात आढळतात. शाहीरूमध्ये शिलेदार, त्यांचे कारकून, नामजाद इत्यादी अधिकारी यांचा समावेश असे.

अजरख्तखाने पत्रांशिवाय आणखी दोन प्रकारची कचेरीपत्रे उपलब्ध आहेत. या पत्रांच्या प्रारंभी 'मशुहरल हजरत' किंवा 'मशुरल अनाम' हे शब्द आढळतात. ही पत्रे सुभेदार, हवालदार, सरहवालदार, वाकनीस, जुमलेदार यांना उद्देशून लिहिलेली असत. या अधिकाऱ्यांच्या उल्लेखानंतर कारकुनांचाही उल्लेख असे. मशुरल पत्रांपैकी 'मशुरल हजरत' असा उल्लेख असलेली पत्रे सुभेदारासारख्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना उद्देशून असावयाची तर 'मशुरल-अनाम' उल्लेख, असलेली पत्रे हवालदारासारख्या अधिकाऱ्यांना उद्देशून असावयाची. विशेष म्हणजे शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाल्यावरही 'अजरख्तखाने' 'मशुरल हजरत' आणि 'मशुरल अनाम' या मुसलमानी मायना पध्दतीचा पत्रलेखनामध्ये वापर झालेला आढळतो. परंतु १६७६ नंतर मात्र मुसलमानी मायना पत्रलेखनामध्ये कटाक्षाने टाळलेला दिसून येतो.

## राज्याभिषेक शकपत्रे

शिवाजी महाराजांनी १६७४ मध्ये राज्याभिषेक केल्यानंतर पत्रलेखन पध्दतीमध्ये बदल केला. अजरख्तखाने किंवा मशरूल या ऐवजी प्रारंभी 'स्वस्ति श्रीराज्याभिषेक



शके'.. असा उल्लेख शिवाजी महाराजांच्या पत्रांतून येऊ लागला. परंतु ही पत्रे हाताच्या बोटावर मोजण्याएवढी उपलब्ध झालेली आहेत. राज्याभिषेक शक असलेल्या पत्रांतून महाराजांनी स्वत:चा उल्लेख 'क्षत्रिय-कुलावतंस श्री राजा शिवछत्रपती' असा केलेला आढळतो. राज्याभिषेक शक कचेरी-पत्रव्यवहारासाठी मराठेशाहीमध्ये पुढेही चालू राहिला हे उपलब्ध झालेल्या कागदपत्रांवरून स्पष्ट होते. हा शक गैरसोयीचा म्हणून सखारामबापू व नाना फडणीस यांनी हुकूम काढून बंद केला असे रियासतकार सरदेसाई यांचे मत आहे.९ परंतु हे मत चुकीचे आहे असे शं. ना. जोशी यांनी स्पष्ट केले असून काही अशुभ योग आल्यास व त्यामुळे छत्रपतींचे राज्यारोहण थांबल्यास प्रस्तुत शकाचा उल्लेख पत्रांतून तात्पुरत्या काळापुरता बंद करण्याची प्रथा होती असे त्यांनी म्हटले आहे.१०

राज्याभिषेकानंतर शिवाजी महाराजांनी पत्रलेखनासाठी स्वीकारलेला 'स्वस्ति श्री' हा मायना प्राचीन काळातील शिला-ताम्र शासनातून आलेला आढळतो. विशेष म्हणजे आपल्या शकाला स्वत:चे किंवा स्वत:च्या वंशाचे नाव देण्याचा अहंभाव शिवाजी महाराजांनी दाखविला नाही.

शिवाजी महाराजांनी सुरू केलेल्या शकाला 'राज्याभिषेक शक' असे नाव असून पुढील काळांत 'राज-शक' असे संक्षिप्त नांव मिळालेले आढळते. शेडगावकर बखरीत 'राजशक' असा निर्देश आलेला आहे. शं. ना. जोशी लिहितात; 'ह्या शकाला युधिष्ठिर, शालिवाहन, विक्रम (संवत्), मौर्य, लक्ष्मण-सेन, गांगेय, परशराम (मलबार) ह्याप्रमाणे शिवाजीने स्वत:चे नांव दिलेले नाही. तर स्मरणीय व अभिलक्षणीय अशी जी विशिष्ट घटना ते नाव दिले आहे. विशिष्ट घटना निदर्शक असे दुसरेही कालगणना करणारे शक शब्द आहेत. हिजरी अथवा बुध्द किंवा वीरनिर्वाण इत्यादी. या सर्वांपेक्षा प्रस्तुतचे शकनाम किती अर्थगंभीर आणि प्रोत्साहक आहे !' शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक शक जरी सुरू केला तरी या शकाच्या उल्लेखाबरोबरच 'सुहुर सन' किंवा फारसी कालगणना यांचा उल्लेख पत्रलेखनामध्ये केलेला आढळतो. त्याचे मुख्य कारण म्हणजे शेकडो वर्षांपासून या फारसी कालगणनेचा पत्रलेखनातून वापर होत असल्यामुळे व्यवहाराच्या सुगमतेसाठी राजशकाबरोबर जुन्या फारसी कालगणनेचाही उपयोग करावा लागला. अगदी अलिकडे स्वातंत्र्योत्तर काळात ख्रिस्तकालगणनेबरोबर भारतीय कालगणनेचा वापर सरकारी पत्रव्यवहारातून करण्याचा प्रयोग झाला.

**उदा.** दि.२ जून १९७४
ज्येष्ठ शु.१३, शके १८९६

तशाच प्रकारे व्यवहाराच्या सोयीसाठी राज-शक आणि सुहूरसन यांचा संयुक्तपणे उपयोग करण्यात आला. फारसी व मराठी असा जोड काल शिवकालीन पत्रव्यवहारामध्ये सुगमतेसाठी उपयोगात आणण्याची प्रथा होती. उदा., एका पत्रात 'सवाल-२५,-- मार्गशीर्ष वद्य व्दादशी, मंदवासर' असा उल्लेख आलेला आहे. ग.ह. खरे लिहितात,'शिवाजीने राजशक सुरू केला हे खरे' पण राजशक सुरू झाल्याबरोबर हिंदू महिना, मिती किंवा राजशक यांचा सर्रास उपयोग होऊ लागला अशी जर कोणाची समजूत असेल तर ती अगदी चुकीची आहे. राज्याभिषेकानंतरची किती तरी पत्रे अशी आहेत की ज्यात शुहुरसन आणि मुसलमानी तारीख व महिना वापरलेले आहेत. उदा., रा.खं.८, ले.३१ पहा. हे पत्र राज्याभिषेक झाल्यावर ५।६ महिन्यांनी लिहिलेले आहे. यात मुसलमानी वर्ष, तारीख व महिना नेहमीच्या पध्दतीने दिलेली आहेत. उत्तरोत्तर मुसलमानी कालगणना शिवाजीच्या पत्रांतून कमीकमी होत जाऊन त्या ठिकाणी राज्याभिषेक शक आणि हिंदू मास व मिती यांचा अधिकाधिक वापर झाला हे मात्र खरे.'११

शिवाजी महाराजांनी सुरू केलेली शक कालगणना काळाच्या ओघात मागे पडली. त्याचे मुख्य कारण म्हणजे शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर स्वराज्यात निर्माण झालेली राजकीय अस्थिरता हे होय. खुद्द शिवाजी महाराजांनी राजशक सामान्य पत्रव्यवहारात वापरलेला आढळत नाही. शिवाय अष्टप्रधानांपैकी पंडीत-राव हा प्रधान सोडल्यास इतर प्रधानांना राजशक वापरण्याची अनुज्ञा नव्हती. शिवाजी महाराजांनी हा शक धर्मप्रधान कार्यासाठी सुरू केला असावा असे शं. ना. जोशी यांचे मत आहे. ते लिहितात,'शिवाजीपुरते पाहता स्वत: शिवाजीच्याच सर्व पत्रांवर हा राजशक नाही. आणि अष्ट प्रधानातील 'पंडितराव' ह्यांच्या पत्रांतून तो येतो ह्यावरून केवळ राजकारणापेक्षा धर्मप्रधान असे जे राजकार्य किंवा राज्यकर्तव्य तत्पर तो होता, हे म्हणणे युक्त दिसते.'१२ ग. ह. खरे मात्र लिहितात, 'शिवाजीच्या दुसऱ्या व तिसऱ्या प्रतीच्या अधिकाऱ्यांनी शिवाजीने प्रयोगात आणलेली कालगणनेची पध्दत उपयोगात आणली असल्याने तीविषयी जास्त लिहिण्याची जरूरी नाही. '१३ खरे यांनी आपल्या विधानासाठी कोणताही आधार दिलेला नाही. राजशकाचा उपयोग किंवा वापर विवक्षित



प्रयोजनासाठी होऊ लागल्यामुळे तो सामान्य व्यवहारांत रूढ होऊ शकला नाही. ग.ह. खरे एके ठिकाणी लिहितात,'हा शक चालू करण्यामध्ये यापूर्वी लोक उपयोगात आणीत असलेल्या शुहूर हिजरी वगैरे यावनी गणना मागे पडाव्या असाही हेतू असेल, पण तो मात्र सिध्दीस गेलेला दिसत नाही. शिवाजी महाराज निग्रही असल्यामुळे त्यांनी आपल्या हयातीपर्यंत या गणनेचा प्राय: सर्वत्र प्रयोग केला. पण संभाजीपासून ती प्रथा सुटली. आणि केवळ छत्रपतींनी दिलेली दानपत्रे, इनामपत्रे व तद्नंतर पेशवे वगैरे दुय्यम अधिकाऱ्यांनी दिलेली संमतिपत्रे यांत मात्र ही गणना तग धरून राहिली. उपर्युक्त मर्यादितही पेशव्यांचे राज्य जाऊन छत्रपती प्रतापसिंह पद्‌च्यूत होईतो कायम राहिली.१४

आतापर्यंत केलेल्या चर्चेवरून शिवाजी महाराजांनी सुरू केली कालगणना सामान्य व्यवहारांत रूढ होऊ शकली नाही असे स्पष्ट होते. तथापि खुद्द महाराजांनी ही कालगणना धर्मकाजासाठी सुरू केलेली होती हे लक्षात घेतल्यास तिचा वापर मर्यादित का झाला ते समजते. ग.ह. खरे यांनी उपरिनिर्दिष्ट उताऱ्यात जी अनुमाने काढली आहेत ती समाधानकारक वाटत नाहीत. शिवकालीन पत्रव्यवहारात जी भाषा दृष्टोत्पत्तीस येते त्याविषयी पुढे विवेचन येईलच.

शिवकालीन पत्रांचा कागद निजामशाही कागदाप्रमाणेच पांढरा, परंतु अरूंद आकाराचा असतो. पत्राच्या आरंभी साधारणपणे १/६ भाग मोकळा सोडण्याची प्रथा होती. शिवकालीन पत्रांचे वैशिष्ट्य म्हणजे 'मोर्तबसुद' किंवा 'मर्यादेयं विराजते' यासारखे शिक्के मजकुराच्या अखेरीस उमटविलेले असत. मात्र तारखेचे दोन व 'सुरू', 'सुद' हे शेरे बहुदा कागदाच्या पाठीवर असत. पत्रलेखन कसे करावे याची तांत्रिक माहिती मेस्तकासारख्या साधनांमधून आलेली आढळते.' १५

ऐतिहासिक साधनांमध्ये शिक्कामोर्तब असलेल्या कागदपत्रांचे महत्व विशेष आहे. राजमुद्रांना अनुलक्षून शिक्का आणि मोर्तब हे शब्द वापरले जात. मराठी भाषेत शिक्का मोर्तब हा शब्द एखादी गोष्ट कागदोपत्री पक्की झाली हे सांगतांना आजही वापरला जातो. शिक्कामोर्तब होणे म्हणजे राजसंमत होणे. शिक्का या शब्दाला 'मोहर' हा प्रती शब्द आहे. शिक्का असलेल्या पत्रावर मोर्तब असतोच. कारण शिक्का हा मजकुराच्या प्रारंभी उमटविलेला असून मोर्तब मजकुराच्या अखेरीस उमटविलेला असतो. थोडक्यात शिक्का म्हणजे प्रारंभ मुद्रा व मोर्तब म्हणजे समाप्ती मुद्रा. पुष्कळ वेळा कागदावर मोर्तब उमटविलेला असतो परंतु शिक्का नसतो. अशी कागदपत्रे

अधिक प्रमाणांत आढळतांत.  परंतु शिक्का आणि मोर्तब या दोन्हीही मुद्रा असलेले पत्र महत्वाचे ठरते. अशी पत्रे संख्येने कमी प्रमाणात उपलब्ध झालेली असली तरी साधनांच्या दृष्टीने त्यांचे महत्व अधिक आहे.

शिवाजी महाराजांची राजमुद्रा अष्टकोनी, उक वलयी, पाच ओळींची आणि संस्कृत भाषेत आहे. मुद्रेवर अनुष्टुभ् श्लोक गुंफलेला आहे तो पुढीलप्रमाणे :

प्रतिपच्चंद्रलेखेव ।<br>
वर्धिष्णु र्विश्ववंदिता ।<br>
शाहसूनो: शिवस्यैषा ।<br>
मुद्रा भद्राय राजते ।।

म.म. द. वा. पोतदार यांनी राजमुद्रेचा अन्वयार्थ असा लावलेला आहे की,

१) शहाजीचा पुत्र शिवाजी त्याची ही मुद्रा आहे.

२) ही मुद्रा लोककल्याणार्थ (येथे) शोभत आहे.

३) (शुध्द पक्षातील) चंद्रकोर जशी (रोज रोज) वाढत जाते.  तशी ही मुद्रा. (म्हणजेच मुद्रेची सत्ता किंवा मराठी राज्य) ही अभिवृध्दी पावणार आणि चंद्रकोर अशी लोकपूजित होते तशीच ही मुद्राही सर्वमान्य होणार.१६

अजरख्तखाने ह्या मायन्याच्या पत्रावर ही मुद्रा शिरोभागी उमटविण्याची प्रथा होती, तर स्वराज्य कार्य करणाऱ्या सहकाऱ्यांना आणि आदरणीय साधु-संतांना पत्रे लिहितांना ही मुद्रा पत्राच्या पाठीमागे खालील बाजूस उमटविण्याची प्रथा होती.  'मशरूल हजरत' आणि 'मशरूल अनाम' त्याचप्रमाणे खाजगी स्वरूपाच्या पत्रावर शिवाजी महाराजांची उपरोक्त मुद्रा उमटविण्याची प्रथा नसावी, असे वाटते.

शिवरायांची ही मुद्रा केव्हापासून कागदपत्रांवर येऊ लागली याचा विचार केल्यास शके १५६१ पासून या मुद्रेचा वापर सुरू झाला असे आज उपलब्ध असलेल्या पुराव्यावरून स्पष्ट होते.  आश्वीन शुध्द ८ शके १५६१ चे एक पत्र राजवाडे खंड १५ मध्ये प्रसिध्द झाले आहे.  हे पत्र अस्सल असून चाकणकर ब्रह्मे यांना त्यांच्या इनाम बाबी पुढे चालविण्याविषयी शिवाजी महाराजांनी त्यात हुकूम दिलेला आढळतो.१७ या संदर्भात म.म. द.वा. पोतदार लिहितात :'शके १५६१ तील मुद्राच शिवछत्रपतींनी राज्याभिषेकोत्तरही चालविली यावरून त्या मुद्रेची पंरपरा शिवप्रभूस अखेरपावेतो अभिमत होती असेच अनुमान प्राप्त होते.'१८.  म.म. पोतदारांनी शिवमुद्रेचा काव्यमय अन्वयार्थ



आपल्या लेखाच्या शेवटच्या परिच्छेदात दिलेला असून 'मराठी सत्तेची शिवकालीन उभारणी ही पायापासून शिखरापावेतो सुरेख व सशास्त्र उभारलेली, न खचणारी, विश्ववंद्य अशी प्रासाद रचना आहे,१९ असे म्हटले आहे.

ही मुद्रा शके १५६१ ची किंवा इ.स. १६३९ या वर्षाची असल्यामुळे एवढ्या बालवयात शिवाजी राजाने स्वराज्य स्थापनेचे स्वप्न रचले होते का, हा प्रश्न उपस्थित होतो.  सन १६३० हे जन्मवर्ष धरल्यास शिवरायाचे वय उपरिनिर्दिष्ट मुद्रांकित पत्रलेखनसमयी केवळ ९ वर्षांचे होते असे मानावे लागेल,  किंवा १६२७ हे जन्मवर्ष मान्य केल्यास त्यांचे वय १२ वर्षांचे होते असे गृहीत धरावे लागेल.  जन्मतिथीचा वाद थोडा बाजूला जरी ठेवला तरी कुमारवयात शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेचे मनोरथ रचलेले होते असा आशय म.म. पोतदार यांच्या निष्कर्षातून व्यक्त होतो. पोतदारांनी आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ सभासद बखरीमधील 'शिवाजी महाराज १२ वर्षांचे असतांना त्यास शहाजी महाराज यांनी पेशवे, सुरनीस वगैरे चार पाच अधिकारी बरोबर देऊन पुणे प्रांते ठेविले' या घटनेचा पुरावा दिलेला आहे.२०  राज्याभिषेकानंरही शिवाजी महाराजांनी कुमारवयातील राजमुद्रा कायम ठेवली, ही गोष्ट पोतदारांना लक्षणीय वाटते.  तथापी कुमारवयातच शिवाजी महाराजांनी स्वराज्य कार्याला प्रारंभ केला असे म्हणणे संयुक्तिक होणार नाही.  २८ जानेवारी १६४६ चे शिवाजी महाराजांचे एक न्यायनिवाडाविषयक पत्र उपलब्ध असून एका बदकर्म करणाऱ्या पाटलाला शिक्षा दिल्याचा निवाडा त्यामध्ये आहे.[२१]  या पत्रावरून शिवाजीराजांच्या कार्यास प्रारंभ झाल्याचे स्पष्ट होते.

याच सुमारास किल्ले-पहाणी आणि मावळ्यांचे संकलन शिवाजी महाराजांनी सुरू केले असावे यात शंका नाही.  कारण १६४६-४७ च्या सुमारास तोरणा-राजगड हे किल्ले  शिवाजी महाराजांनी सर केले.  कुमारवयात निश्चित केलेली राजमुद्रा स्वराज्यकार्याच्या प्रारंभानंतर आणि राज्याभिषेकानंतर महाराजांनी कायम ठेवली,  त्यावरून स्वराज्याच्या ध्येयधोरणाशी मुद्रेतील मजकूर सुसंवादी होता असा निष्कर्ष काढण्यास कोणताही प्रत्यय येत नाही.

शिवाजी महाराजांचे अनुकरण करून छत्रपती राजारामाने सुद्धा 'प्रतिपत्' या अनुकरणाची मुद्रा तयार केली.  'श्री प्रतिपत् चंदलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता शिवसूनोरियं मुद्रा राजारामस्य राजते'२२ या मुद्रेचा आकार अष्टकोनी नसून वाटोळा आहे. राजारामाच्या इतर मुद्राही उपलब्ध असून त्यातील मजकूर भिन्न प्रकारचा आहे.

तेव्हा 'प्रतिपत्' या अनुकरणाची मुद्रा तयार करण्याचे राजारामाला काय प्रयोजन पडले असा प्रश्न उपस्थित होतो. शं.ना. जोशी यांनी असा तर्क लढविला आहे की, राज्यपद मिळाल्यानंतर राजारामाने नवी इनामे आणि वतने दिली. तेव्हा 'धर्मप्रद्योदिता' मजकूर असलेल्या मुद्रेचा राजपत्रांसाठी वापर केला तर जिंजीहून परत आल्यानंतर सनदांचा फेरविचार करून नव्या सनदा देण्यासाठी 'प्रतिपत्' या अनुकरणाच्या दुसऱ्या मुद्रेचा उपयोग केला. जुन्या आणि नव्या सनदांचा फरक स्पष्ट करण्यासाठी ही नवी मुद्रा -'प्रतिपत्' मजकुराची राजारामाने तयार केली असावी असा तर्क शं.ना. जोशी यांनी केला आहे.[२३] जिंजीहून परत आल्या नंतर म्हणजे १६९८ च्या प्रारंभी राजारामाने औरंगजेबाविरोधी महाराष्ट्रात चौफेर लढा सुरू केला. १६९९ मध्ये तर महाराष्ट्राबाहेरील मुघली प्रदेशात आक्रमण करण्याची महत्वकांक्षी योजना राजारामाने आखली. या योजनेचे चित्रण अमात्यांच्या आज्ञापत्रामध्ये आलेले आहे. २४ उत्तरेकडे स्वारी करून काशी विश्वेश्वरापर्यंतचा प्रदेश मुक्त करण्याचा राजारामाचा संकल्प होता. तो तडीस गेला नाही. ही गोष्ट वेगळी. तथापि उत्तरेत आणि दक्षिणेत मुघल प्रदेशांत मराठ्यांनी १६९९-१७०० या वर्षात घुसखोरी केली होती. नेमाजी शिंदे, कृष्णाजी सावंत या मराठा सरदारांनी भोपाळ, सिरोज इत्यादी स्थळांपर्यंत स्वारी केली अशी माहिती मिळते. त्याचप्रमाणे धनाजी जाधवाने मे १६९९ मध्ये हैद्राबादपर्यंत धडक मारली होती. थोडक्यात जिंजीहून राजाराम परत आल्यानंतर मराठ्यांना वेगळे स्फुरण चढले होते. शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याच्या रक्षणासाठी मराठ्यांनी शर्थीचा लढा सुरू केला होता. शिवाजी महाराजांच्या ध्येयधोरणाची आंच मराठ्यांना लागलेली होती. नवा जोश, नवा हुरूप मराठ्याच्या ठायी निर्माण झाला होता. अशा चैतन्यमय वातावरणात उपरोक्त 'प्रतिपत' या अनुकरणाची मुद्रा राजारामाने तयार केली असावी असे मला वाटते. राजारामाच्या नियोजित उत्तरेकडील स्वारीच्या संदर्भात सविस्तर विवेचन मी माझ्या 'आज्ञापत्राचा लेखनकाल' या निबंधात केले आहे. २५ शिवरायाची मुद्रा राजारामाच्या काळात किती स्फूर्तिदायक ठरली हे सिद्ध होते.

राजारामाची तिसरी एक मुद्रा 'श्री राजाराम छत्रपती' एवढ्याच मजकुराची तीन ओळीत लिहिलेली आणि चौकोनी आकाराची उपलब्ध आहे. अर्थात् राजारामाच्या सर्वच मुद्रांचा येथे विचार करण्याचे कारण नाही.

'शिवाजी महाराजांची समाप्ती मुद्रा 'मर्यादेयं विराजते' या मजकुराची तीन ओळींत



तयार केलेली होती. ही मुद्रा लंब षटकोनी असून सातारा आणि कोल्हापूर या दोन्हीही शाखांकडे इतिहासकाळात रूढ होती असे दिसून येते. कोल्हापूर शाखेचे छत्रपती 'मर्यादेयं विराजते' ही मुद्रा उपयोजनात आणीत होते. तर सातारा शाखेचे छत्रपती मर्यादेराजते ही मुद्रा उप योजनात आणीत होते. शिवरायाची समाप्तीमुद्रा दोन्ही शाखांना वंदनीय आणि अनुकरणीय वाटली ही गोष्ट उल्लेखनीय आहे.

समाप्तीमुद्रांच्या बाबतीत एक विशेष आढळतो. तो म्हणजे सर्वसाधारणपणे प्रारंभीची मुद्रा ज्या कोनांची असेल तितक्याच कोनांची, परंतु लहान आकाराची समाप्ती मुद्रा असते. जर प्रारंभी मुद्रा अष्टकोनी असेल तर समाप्ती मुद्राही अष्टकोनीच असावयाची.

शिवकालीन पत्रांचा विचार करताना एक गोष्ट मान्य करावी लागते ती म्हणजे मुसलमानी पत्रलेखन पद्धतीचा आणि फारसी व उर्दू या दरबारी भाषांचा परिणाम मोठ्या प्रमाणावर झालेला आढळतो. उदा., शिवाजी महाराजांच्या पत्रात शिक्के व शेरे या बाबतीत निजामशाही आणि आदिलशाही पद्धतीचा प्रभाव आढळतो. परंतु मुघली आणि आदिलशाही पत्रांप्रमाणे पदव्यांची खैरात मात्र शिवाजी महाराजांच्या पत्रात आढळत नाही. मुसलमानी राज्यकर्त्यांनी पत्रलेखनाच्या पद्धती भारताबाहेरून आणल्या किंवा एतद्देशीय राज्यकर्त्यांच्या पद्धती स्वीकारल्या याविषयी निश्चित सांगणे अवघड आहे. या संदर्भात ग.ह. खरे लिहितात, '' ज्या गोष्टी मराठी राज्यकर्त्यांनी मुसलमानापसून घेतल्या असे दिसते त्या मुसलमानांनी कोठून आणल्या याचा शोध केला पाहिजे कदाचित त्यांपैकी पुष्कळ भाग मुसलमानपूर्वकालीन हिंदू राज्यकर्त्यां पासून घेतला असण्याचा संभव आहे. कदाचित बगदादकडील राज्यांतूनही यापैकी काही गोष्टी आलेल्या असण्याचा संभव आहे.''[२६]

राज्यकर्त्यांचे पत्रलेखन सामान्यत: चिटणीस करीत असे. शिवाय सही करण्याची पद्धती शिवकालात अस्तित्वात नव्हती त्यामुळे शिवाजी महाराजांचे हस्ताक्षर उपलब्ध नाही. महाराजांच्या हस्ताक्षरासंबंधी मते मतांतरे मांडली गेलेली आहे. ग्रँट डफ यांचे मत शिवाजीला लिहीता वाचता येत नव्हते. इ. राजवाडे यांनी हे मत आपल्या चौथ्या खंडाच्या प्रस्तावनेत पुराव्यानिशी खोडून काढले आहे. शिवाजी राजांना लिहीता वाचता येत नव्हते असा ग्रह यदुनाथ सरकारांचाही झालेला होता. 'Shivaji was illterate. He learned nothing by reading.' [२७] यदुनाथ सरकारांचे हे मत महाराष्ट्रातील बहुतेक इतिहास संशोधकांनी अभिनिवेशाने खोडून काढले आहे. सम्राट अकबराप्रमाणे शिवाजी राजे निरक्षर होते हे मत आज ग्राह्य धरले जात नाही. शिवाजी

राजांच्या हस्ताक्षरासंबंधी वाद जरी असला तरी ते साक्षर होते हे सिद्ध करणारा वाङ्‌मयीन पुरावा उपलब्ध आहे. वखारवाल्या इंग्रजांच्या पत्रव्यवहारातून शिवाजी राजांच्या साक्षरते विषयी उल्लेख येतात. ६ फेब्रुवारी १६६३ च्या एका पत्रातील उल्लेख पहा.'... अशा मजकुराचे शिक्यानिशी खुद्द शिवाजीचे, ज्याच्यावर चंदनाचा (गंधाचा) त्याच्या हाताचा छाप वठविला होता, असे आलेले पत्र त्याने आम्हाला दाखविले'[२८] इंग्रजी पत्रातील हा उल्लेख मनोरंजक असून अशाप्रकारे शिवरायांच्या हाताचा छाप असलेला कागद उपलब्ध झाला, तर इतिहासामध्ये निश्चितच मोलाची भर पडेल.

परंतु उपरोक्त मजकुराचे पत्र खुद्द शिवाजी महाराजांनी लिहिले होते हे निश्चितपणे सिद्ध होत नाही. नोव्हेंबर १६७० च्या एका पत्रात,''शिवाजीच्या मुलखांत फ्रेंचांनी एक वखार घातली असल्यामुळे शिवाजीने स्वहस्त लेखाने'आपण सुरतेवर हल्ला करणार आहो. परंतु तुमच्या रक्षणाची काळजी घेतली जाईल असे समजून स्वस्थ रहावे असे फ्रेंचांना कळविले होते. हा मजकुर आलेला आहे.[२९] ' ८ मे १६७४ च्या पत्रात,' नारायण शेणव्याकडून तहाबद्दलचे शिवाजीच्या सहीचे (Signed by Sevag) कागद आले.' असा मजकूर आलेला आहे. [३०] ऑक्झींडेन हा इंग्रज वकील शिवाजी राजांच्या राज्याभिषेक प्रसंगी रायगडावर उपस्थित होता. त्याने आपल्या रोजनिशीत राज्याभिषेकाचे वर्णन केलेले असून इंग्रजांबरोबर केलेल्या तहाचीही माहिती दिलेली आहे.

**जून ११ :**

नाव्याशिवाय इतर सर्व कलमे मान्य करून राजाने सही केल्याची वार्ता निराजीने सांगितली. दुसऱ्या दिवशी प्रधानांच्या सह्या होऊन आम्हाला निघण्यास हरकत नाही असे सांगितले.

**जून १२ :**

सर्व प्रधानांच्या सह्या, झाल्या........''[३१]

उपरीनिर्दिष्ट इंग्रजी पत्रातील मजकुरावरून शिवाजीराजे सह्या करीत होते किंवा स्वत: लिहीत होते असा अर्थ निघू शकतो. परंतु पत्रावर सह्या करण्याची पद्धत शिवकालात नव्हती. वर निर्देश केलेल्या पत्रांवर शिवाजी राजांनी मुद्रा उमटविलेल्या असाव्यात. अशा पत्रांनाच बहुधा इंग्रज शिवाजीच्या हस्ताक्षराची पत्रे म्हणत असावेत. त्यामुळे इंग्रज आणि डच रेकॉर्डस्‌मधील उल्लेख शिवाजी महाराजांची साक्षरता सिध्द करण्यास पुरेसे नाहीत.

शिवाजीच्या साक्षरतेचा पुरावा शिवभारत या साधनग्रंथामध्ये मिळतो. शिवभारताच्या



९व्या अध्यायात शिवाजी मुळाक्षरे शिकला असा स्पष्ट उल्लेख आहे.[३२] शिवभारतामध्ये १० व्या अध्यायात बाळ शिवाजीला कोणते शिक्षण दिले त्याचे वर्णन आलेले असून श्रुती, स्मृती, महाकाव्ये, पुराणे,गणित, ज्योतिष, वास्तुविद्या, अश्वारोहण. धनुर्वेद, युद्धशास्त्र, रत्नपरीक्षा यासारख्या विषयांचे शिक्षण देण्यात आले असे स्पष्ट म्हटले आहे.[३३] ९१ कलमी बखरीमध्ये २० व्या कलमात शहाजीने दादोजी कोंडदेवला 'चिरंजीवास शहाणे करणे' अशी आज्ञा दिल्याचा उल्लेख आहे. पुढे २१ व्या कलमात म्हटले आहे, दादाजीपंताने सिऊबास शाहाणे केले. घोडे फिरविणे ऐसे तरबेज केले'३४ शिवदिग्विजय सारख्या उत्तरकालीन बखरीमध्ये शिवाजी महाराजांची चतुर्दशविद्या अध्ययन केल्या असे म्हटले आहे परंतु उत्तरकालीन बखरीचा हा पुरावा ग्राह्य मानता येणार नाही.

शिवभारत आणि ९१ कलमी हे साधनग्रंथ शिवकालाच्या इतिहासाच्या अभ्यासासाठी बहुतअंशी विश्वसनीय मानले जातात. त्यामुळे शिवाजी महाराज निरक्षर होते हे विधान हास्यास्पद ठरते. वास्तविक पाहता शिवाजी महाराजांच्या साक्षरतेसाठी कागदोपत्री पुरावा शोधण्याची तशी आवश्यकता नाही. शिवकालातील उपलब्ध असलेल्या कागदपत्रांचा विचार केल्यास इतर कालखंडाच्या मानाने हे कागदपत्र अल्प आहेत. या तुटपुंज्या साधनांचा विचार करून केलेला हा आरोप अन्यायकारक आहे असे म्हणावे लागेल. शहाजीची विद्वत प्रवृत्ती आणि शिवपुत्र संभाजीचं पांडित्य या गोष्टी लक्षात घेतल्यास या युगपुरूषास अक्षरपरिचय नव्हता असे म्हणणे योग्य होणार नाही. मराठी भाषेच्या पुनरूज्जीवनासाठी, संस्कृत भाषेच्या उत्कर्षासाठी धडपडणारा शिवाजी निरक्षर होता ही कल्पनाच कीव करण्यासारखी आहे. अक्षर परिचय तर राहोच, परंतु शिवाजी महाराज अनेक शास्त्रांचे जाणकार होते हे निश्चित ! 'राज्य व्यवहार कोश', 'करणकौस्तुभ' यासांरखे ग्रंथ त्यांनी विद्वानांकडून लिहून घेतले ही गोष्ट येथे लक्षात घेणे आवश्यक आहे. डॉ.बाळकृष्ण शेजवलकर यांच्यासारख्या सिद्धहस्त इतिहासकारांनी शिवाजी महाराजांना 'सुयोग्य शिक्षण लाभले होते' असे मत व्यक्त केलेले आहे.

तंजावर येथील सरस्वती महाल ग्रंथालयात १७ व्या शतकातील एक हस्तलिखित असून शिवाजी महाराजांच्या ठायी असलेल्या गुणांचे एक टिपण त्यात दिलेले आहे. त्यामध्ये गजपरिक्षा, अश्वपरिक्षा, रत्नपरिक्षा, शस्त्रपरिक्षा, इत्यादी गुण सांगितले आहेत. शिवाय 'वरद्‌कविता शक्ती' नावाचा एक गुणही सांगितलेला आहे.३५ आतापर्यंत केलेल्या विवेचनावरून शिवाजी महाराज केवळ साक्षरच नव्हे तर अनेक शास्त्रांचे जाणकार होते हे लक्षात येईल.

राज्याभिषेक प्रसंगी शिवाजी महाराजांनी मुलकी, लष्करी आणि धार्मिक विषयांत नव्या सुधारणा केल्या. त्यांना 'पद्धती' असे म्हणत. इतिहासाचार्य राजवाडे लिहितात,'जुने शिल-शिले पाहून व तत्कालीन रीतीरिवाज पाहून, ह्या पद्धती तयार केल्या गेल्या. अशा पद्धतींपैकीच 'लेखनप्रशस्ती' म्हणून एक पध्दती शिवछत्रपतींच्या आज्ञेवरून बाळाजी आवजी चिटणीस व इतर मुत्सद्दी मंडळी ह्यांच्या विचाराने रचली गेली.'.[३६] प्रस्तुत लेखनप्रशस्तीच्या संदर्भात इतिहासाचार्य राजवाडे यांनी खुलासा केलेला आहे ;'राज्यव्यवहारकोश व लेखन प्रशस्ती ही जी दोन साधने शिवाजीने निर्माण केली त्यांपैकी 'राज्यव्यवहारकोश' छापून प्रसिद्ध झालेला आहे; लेखनप्रशस्ती झाली नाही. .......' ही लेखनप्रशस्ती जशीच्या तशी संवद सापडलेली नाही. परंतु बहुतेक बराच मजकूर, एक दोन जुन्या बाडांत लिहिलेला आढळला.[३७]

इतिहासाचार्य राजवाडे यांना ज्या दोन जुन्या बाडांत लेखन प्रशस्तीची माहिती सापडली ती त्यांनी भारत इतिहास संशोधक मंडळाच्या शके १८३२ च्या अहवालात प्रसिद्ध केली. [३८] इ. राजवाडे यांच्या मताप्रमाणे शिवाजी महाराजांनी जो लेखनप्रशस्तीचा कायदा केला त्यात एकंदर सात मुख्य बाबी होत्या.

१) राजश्रीनी सर्वांस लिहिण्याचा जाबता राजकीय संप्रदाय धारे.
२) अष्टप्रधानादी पदाधिकारी यांचा परस्परे व स्वामीस लिहिण्याचा संप्रदाय
३) लहानथोर मराठे मंडळ यांनी लिहिण्याचा संप्रदाय.
४) यवनी पत्रे लिहावयाची चाल.
५) जमीदारी लिहावयाचे संप्रदाय.
६) व्यावहारिक सर्व संप्रदाय अहद ब्राह्मण तहद एकंदर चाल.
७) जमाखर्च, हिशेबाचे धारे, हेमाडपंथी आहेत, शिवाय नवीन ठरविले. [३९]

इ. राजवाडे यांनी शिवाजी महाराजांनी प्रचलित केलेल्या लेखनप्रशस्तीचे महत्व विशद केलेले आहे,'स्वराज्य सुरू होऊन इतकी वर्षे झाली असता, राज्यातील अधिकारी, मुत्सद्दी, कामगार व इतर लोक राजास व परस्परास लिहितांना मनास येईल तो मायना योजतात ; त्यामुळे एक शिस्त रहात नाही. सबब ही प्रशस्ती उपरिनिर्दीष्ट कामगारांच्या उपयोगार्थ प्रसिध्द केली जात आहे. हा उपोद्घात झाल्यावर, हेमाडपंताच्या काली पत्रलेखनाच्या प्रशस्त्या होत्या असे विधान करून, नंतर मुसलमानी



अंमलात त्यांच्यात फेरफार झाले, हे सांगितले आहे. हे राज्य हिंदूंचे असल्यामुळे मुसलमान पातशाहा व अधिकारी जे मायेने योजीत ते मायेने जसेचे तसे घेणे अशक्य आहे, तेव्हा मुसलमानांच्या पूर्वी शिलशिला काय होता ते पाहून व मुसलमानी मायन्यांतून घेण्यासारखे असेल तेवढे घेऊन, देशकाल वर्तमानारूप नवी लेखनप्रशस्ती प्रचलित केली पाहीजे, अशी मतलबाची वाक्ये पुढे आहेत. उपोद्घात व पूर्ववृत्तान्त लिहून नंतर मुख्य विषयाचा उपन्यास केला आहे. ४०. इ. राजवाडे यांनी दिलेल्या तपशिलावरून लेखनप्रशस्तीचर ग्रंथ महत्वपूर्ण असला पाहिजे हे स्पष्ट दिसते. या ग्रंथाच्या उपलब्ध हस्तलिखित बाडांचे संपादन करून ते प्रसिद्ध करण्याची नितांत आवश्यकता आहे.

शिवाजी महाराजांच्या उपलब्ध झालेल्या आणि विविध ग्रंथातून व संशोधनपर मासिकांतून प्रसिद्ध झालेल्या पत्रांचे आलोचन शं.ना. जोशी यांनी अर्वाचीन महाराष्ट्रेतिहासकालातील राज्यकारभाराचा अभ्यास-भाग १ ला, या ग्रंथात केलेले आहे. 'शिवाजी राजांच्या पत्रांची गणना' या १० व्या प्रकरणात जोशी यांनी दोन तक्ते दिलेले असून पहिल्या तक्त्यात शिवाजी राजांची ग्रंथवार पत्रे दिलेली आहेत, तर दुसऱ्या तक्त्यात त्यांची तारीखवार पत्रे दिलेली आहेत. दुसऱ्या तक्त्यामध्ये पत्र अस्सल आहे, नक्कल आहे किंवा संशयित आहे याचे विवरण दिलेले आहे. शिवाजी महाराजांच्या पत्रांचा अभ्यास करताना शं.ना. जोशी यांनी दिलेल्या तक्त्यांचा अभ्यासकांना विशेष उपयोग होण्यासारखा आहे. विशेषत: पत्र अस्सल किंवा नकल हे ठरविल्याशिवाय शिवाजीच्या पत्राचा विचार करणे किती चुकीचे ठरेल हे तक्त्यावरून अभ्यासकांनी समजावून घेणे आवश्यक आहे. उदा. दादाजी नरसप्रभू देशपांडे याला शिवाजी महाराजांनी १६४५ मध्ये दिलेले पत्र उपलब्ध असून त्यामध्ये,'श्री रोहिरेश्वर तुमचे खोरीयातील आदी कुलदेव, तुमचा डोंगरमाथा पठारावर शेंद्रीलगत स्वयंभू आहे, त्यांनी आम्हास यश दिले व पुढे तो सर्व मनोरथ हिंदवी स्वराज्य करून पुरविणार आहे.... हे राज्य व्हावे हे श्रींचे मनात फार आहे.' असा मजकूर आलेला आहे. (पत्र क्र.३) शिवाजीचा ध्येयवाद स्पष्ट करणाऱ्या या पत्रात हिंदवी स्वराज्याचा उल्लेख आहे. परंतु हे पत्र संशयास्पद असल्याचे मत राजवाडे, आपटे, शेजवलकर, ग.ह. खरे इत्यादी अभ्यासकांनी व्यक्त केले आहे. तेव्हा शिवाजी महाराजांच्या कार्याचे स्वरूप समजावून घेतांना किंवा विशद करतांना पत्र अस्सल आहे की संशयित आहे हे प्रथम पहाणे आवश्यक ठरते. प्रस्तुत प्रस्तावनेमध्ये शिवकार्याचे स्वरूप स्पष्ट करतांना

बहुतांशी अस्सल ठरलेल्या किंवा मानले गेलेल्या पत्रांचा विचार करण्याचे योजिले आहे. तत्पूर्वी शिवाजी राजांच्या खासगी पत्रांचा विचार करणे आवश्यक ठरेल.

खाजगी पत्रे हा पत्रप्रकार हेच देशी सत्ता सुरू झाल्याचे एक सुलक्षण होय असे शं.ना. जोशी यांनी म्हटले आहे. [४१] शिवाजी महाराजांच्या खाजगी पत्रांचा विचार करतांना अजरख्तखाने मजकुराची पत्रे त्यामध्ये गणण्याचे प्रयोजन नाही. वास्तविक पहाता काही कचेरीपत्रांतून खाजगी स्वरूपाचा मजकूर आलेला आढळतो. उदा.,'तुम्हांस साहेब घरीच्या लेकरासारिखे जाणिती' यासारखा मजकूर कचेरीपत्राततही आढळतो. परंतु अशा मजकुराची पत्रे खाजगी गृहीत धरता येणार नाहीत.

खाजगी पत्रांची लक्षणे शं.ना. जोशी यांनी पुढीलप्रमाणे दिलेली आहेत.

१) 'कचेरी मायना अजरख्तखाने' वा 'मशूरूल नाही, कालदिर्शन नाही, शिवराज नाममुद्रा नाही, आणि प्रधानांची तर नाहीच; तसेच

२) ज्यावर श्रीकार आहे; जे आप्तसुहृदांना वा गुरूंना लिहिले आहे व त्यांना योग्य असा मायना आहे आणि आशीर्वाद इ. संबंध, योग्य अशी नमस्क्रीया आहे,'बहुत लिहिणे', 'कळले पाहीजे' इत्यादी समाप्ती संकल्प आहे,' मर्यादेयं ही समाप्तीस मुद्रा उठविलेली आहे ते खाजगी पत्र होय.'[४२]

शिवाजी महाराजांच्या पत्रांमधील मायने व्यक्तिपरत्वे वेगवेगळे आलेले आढळतात. जिजाबाईस पाठविलेल्या पत्रात 'वडिलांचे सेवेसी' असा मायना असून 'चरणावरी मस्तक ठेवून विज्ञापना' हा मजकूर प्रारंभी लिहिलेला आहे. समर्थ रामदासांना लिहिलेल्या पत्रात ''सद्‌गुरूवर्य सकलतीर्थ कैवल्यधाम व महाराज आणि स्वामी'' अशी पांच विशेषणे उपयोजनात आणलेली आहेत, आणि 'वडिलांचे सेवेसी' च्या ऐवजी 'चरणरज्' असा उल्लेख केलेला आहे. व्यंकोजीला लिहिलेल्या पत्रात श्रियासह चिरंजीव अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री 'माहाराज' हा मायना आलेला आहे. देवतांना उद्देशून शिवाजी महाराज लांबलचक संस्कृतप्रचूर मायने उपयोजनात आणीत असत.[४३]

खाजगी पत्रांच्या संदर्भात पत्रावरील श्रीकारात 'श्री महादेव' आणि 'श्री कुलस्वामिनी' असे शब्द आलेले आहेत. पत्राची समाप्ती 'बहुत काय लिहिणे' 'बहुत काय लिहिणे तुम्ही सूज्ञ असा' आणि 'कळले असावे' या प्रकारच्या वाक्यामध्ये केलेली दिसून येते. विशेष म्हणजे समाप्तीच्या वाक्यानंतर 'मोर्तब' लिहून त्यापुढे 'मर्यादेयं विराजते' ही समाप्ती मुद्रा उमटविलेली असे. त्यावरून तत्कालीन फारसी पत्रलेखन पद्धतीचा प्रभाव मराठीवर दिसून येतो.



शिवाजी महाराजांच्या खाजगी पत्रांमध्ये कौटुंबिक मजकूर स्वाभाविकपणे येत असला तरी राजनैतिक स्वरूपाचा मजकूर प्राय: येत असे. किंबहुना राजनैतिक प्रयोजनासाठीच महाराजांकडून पत्रे लिहिली जात. व्यंकोजीला लिहिलेल्या पत्रांतून शिवाजी महाराजांची राजनिती त्यांच्या शब्दांतून दृगोचर होते.

शिवाजी महाराजांच्या पत्रांपैकी बहुसंख्य पत्रे नकल किंवा क्वचित संशयित म्हणून गणली गेलेली आहेत. नकल पत्र हे मूळ पत्राचीनकल असली तरी ती तंतोतंत बरोबर आहे हे अजमावणे अवघड असते. किंबहुना अस्सल पत्र उपलब्ध नसल्यास त्याचे नकल पत्र पूर्णत: विश्वसनीय मानणे योग्य ठरत नाही. काही नकल पत्रांमध्ये नकलकाराने भर घातलेली असावी असा संशय येतो. उदा.,सिद्धेश्वर भट ब्रह्मे चाकणकर यांना शिवाजी महाराजांनी वर्षासनासंबंधी लिहिलेली पत्रे नकल आहेतच, परंतु या पत्रांमध्ये नकलकाराने आपल्याला हवा असलेला मजकूर घुसडून दिलेला आहे. रजमान १ सुहूर १०५४ म्हणजे १७ जुलै १६५३ च्या पत्रात असा उल्लेख आहे की, 'स्वामींच्या अनुष्ठानबळे राज्यास अधिकारी जालों व सकळ मनोरथ चिंतिले पावलो ऐसा अनुभव आला.' शिवाय पत्राच्या शेवटी 'राज्य स्वामींच्या प्रसादाचे फळ आहे आपण आज्ञाधारक आसो' असे म्हटले आहे. या पत्राचा मजकूर काळजीपूर्वक तपासल्यास दोन गोष्टी लक्षात येण्यासारख्या आहेत. एक म्हणजे १६५२ पर्यंत शिवाजी महाराजांनी दोन तीन किल्ले जिंकण्यापलीकडे राजकारण केलेले नव्हते. सिंहगडसारखा किल्ला तर आदिलशहाला परत देऊन महाराजांनी आपले वडिल शहाजी राजे यांची सुटका केली होती. तेव्हा 'राज्यास अधिकारी जालो' या सारखा अतिशयोक्तीपूर्ण मजकूर महाराज लिहिणे शक्य नव्हते. दुसरी गोष्ट म्हणजे अनुष्ठान बळावर मनोरथ पूर्ण करण्याचा भाबडा दैववाद महाराजांजवळ निश्चितच नव्हता. तेव्हा उपरिनिर्दिष्ट पत्र नुसते नकल नसून त्यात विपर्यस्त मजकूर घुसडलेला दिसतो ही गोष्ट स्पष्ट आहे.

नकलपत्रे केव्हा आणि कोणत्या प्रयोजनासाठी तयार करण्यात आली हे स्पष्ट करणे जिकिरीचे आहे. कारण उपलब्ध नकलपत्रे नेमकी केव्हा नकल करण्यात आली त्या तारखा संबंधित नकलकारांनी दिलेल्या नाहीत.

काही पत्रांच्या नकला १८ व्या शतकात , तर काहींच्या नकला १९ व्या शतकात तयार केलेल्या आढळतात. उदा. फाल्गुन शु.१ शके १५७४ च्या पत्रात अखेरीस 'लेखनालंकार' हा शब्द आलेला आहे. त्यावरून हे पत्र शके १५७४ किंवा

सन १६५३ चे जरी असले तरी त्याची नकल शिवाजीच्या राज्याभिषेकानंतर केव्हा तरी केलेली असावी असे वाटते. कारण लेखनालंकार लिहिण्याची प्रथा राज्याभिषेक शक सुरू झाल्यानंतर प्रचारात आलेली होती. इतिहासाचार्य राजवाडे यांनी ८ व्या खंडात काही नकल पत्रांच्या संदर्भात विवेचन केलेले आहे. 'पत्रे नक्कल आहेत व मूळ नसून भाषांतर आहेत. ही भाषांतरे शिवाजीच्या वेळेस केलेली नसून अलीकडे कोणीतरी केलेली आहेत हे पत्रांच्या भाषेवरून स्पष्ट होते. शिवाय मूळ फारसीची ही बरोबर भाषांतरे आहेत असेही नाही. मुसलमान धर्मरक्षक हे विशेषण भाषांतरकाराने शिवाजी व शाहू यास दिले आहे. परंतु ते वस्तूत: दिल्लीच्या पातशाहांचे विशेषण आहे. भाषांतरकारास ही गोष्ट समजली नव्हती. कारण हा भाषांतरकार प्राय: इसवीच्या एकोणिसाव्या शतकातला असून तो विशेष चिकित्सक नव्हता.' ह्या सर्व पत्रांत दिलेल्या जुलुसी सनांवर व तारखांवर माझा यत्किंचतही भरवसां नाही. नकलकारांच्या हस्तदोषांमुळे मुळ पत्रांतील मजकूर पुष्कळ वेळा विपर्यस्त होण्याचा संभव असतो. उदा. एका पत्रामध्ये 'इमान' या शब्दाच्याऐवजी 'इनाम' हा शब्द नकलकाराने लिहिला आहे. या हस्तदोषामुळे अर्थाचा अनर्थ कसा होतो ते सांगण्याची आवश्यकता नाही.

काही पत्रे बखर वाड्:मय यांमधून उपलब्ध झालेली आहेत. उदा. शेडगावकर बखरीमध्ये व्यंकोजीला लिहिलेले पत्र आलेले आहे. समर्थ रामदासांनी शिवाजी महाराजांना लिहिलेल्या काव्यमय पत्राचाही येथे उल्लेख करणे आवश्यक आहे. काही पत्रे महजर प्रसंगी पुरावा म्हणून दाखविलेली आहेत. नकल पत्रांच्या मर्यादा लक्षात घेऊन इतिहास लेखनासाठी त्यांचा उपयोग करावा लागतो. राजखंड १५ मधील लेखांक २६९ हे पत्र शिवाजी महाराजांच्या प्रारंभीच्या हालचाली स्पष्ट करणारे आहे आणि म्हणून शिवचरित्राच्या साधनांमध्ये या पत्राला विशेष महत्व आहे परंतु हे पत्र नकल आहे. त्यातील मजकुराविषयी इतिहासकारांना संशय वाटतो, स्वत: इतिहासाचार्य राजवाडे यांनी पत्राखाली तळटीप दिलेली आहे. ''अज रख्तखाने हे शब्द शिवाजीचा किताब आहे असे स्मृतीने लिहिणारा समजतो त्या अर्थी पत्र अविश्वसनीय दिसेल परंतु मतलब खरा असावा.''[४५]

शिवाजी महाराजांच्या पत्रांपैकी ३६ पत्रे इ.राजवाडे यांनी ८ व्या खंडात प्रसिद्ध केली आहेत. या खंडाला एक प्रदीर्घ प्रस्तावना लिहून शिवाजी महाराजांच्या पत्रांचे विश्लेषण सविस्तरपणे त्यांनी दिलेले आहे. विशेषत: अस्सल आणि नकल हे वर्गीकरण,



पत्रांचे कागद, कागदांच्या घड्या, मोडी लिपी, पत्रांतील भाषा यासंबंधी त्यांनी सविस्तर चर्चा केलेली आहे. मोडी लिपीचा शोध हेमाद्रीने लावला असे रूढ मत आहे. इ. राजवाडे यांच्या मताप्रमाणे मोडी लिहिण्याची पद्धत हेमाद्रीने मुसलमानांच्या शिकस्ता नामक लेखनपद्धतीपरून घेतली. [४६]

शिवाजी महाराजांच्या पत्रातील भाषेचा विचार करताना प्रथम एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे ती म्हणजे राजकीय स्वरूपाच्या पत्रांमध्ये महाराजांनी शब्दांचा वापर काटेकोरपणे आणि सावधपणे केलेला आढळतो. उलट खाजगी पत्रे ही अधिक सविस्तर आणि काही प्रमाणात भावनाविवश होऊन लिहिलेली आढळतात. या दृष्टीने व्यंकोजी राजांना लिहिलेली पत्रे अभ्यास करण्यासारखी आहेत. महाराजांच्या पत्रांतून फारसी शब्दांचा सर्रास वापरआहे. अर्थात् १७ व्या शतकातील मराठी भाषेवर फारसी व उर्दूचा प्रभाव असणे अत्यंत स्वाभाविक होते. ९१ कलमी बखर किंवा सभासद बखर यांसारख्या गद्य वाड्:मयातील मराठी भाषेवर ही फारसी-उर्दूचा प्रभाव आढळतो.

इ.राजवाडे यांनी ८ व्या खंडातील पहिल्या लेखांकाच्या भाषेच्या दृष्टीने उपप्रस्तावनेत ऊहापोह केलेला आहे. ह्या लेखाकांत एकंदर ९१ शब्द असून त्यांपैकी ३० शब्द फारशी आहेत. उरलेले जे ६१ शब्द आहेत, त्यांपैकी २।३ शब्द वगळल्यास, फारसी शब्दांचे मराठी तर्जुमे आहेत. ८ व्या खंडातील लेखांक ३६ हे शिवाजी महाराजांचे एक आज्ञपत्र आहे. सन १६७७ च्या या पत्रात ३१ फारसी शब्द आल्याचे इ. राजवाडे यांनी प्रत्यक्ष मोजुन दर्शविले आहे. त्यातील काही शब्द २ किंवा अधिक वेळा आलेले आहेत. या संदर्भात इ.राजवाडे लिहितात,'शिवाजीच्या पत्रांत मायन्यांतले शब्द बरेच संस्कृत आहेत. परंतु शिवाजीच्या पूर्वी तीनशे वर्षे फारसी शब्दांचा वापर व प्रयोगांचा जो बेसुमार भरणा मराठीत होत होता तो राज्यव्यवहारकोशादी साधनांनी भाषा सुधारणाऱ्या ह्या शककर्त्यालाही पदोपदी स्पर्श केल्यावाचून राहिला नाही.[४७] असे असले तरी शिवकालामध्ये पत्रव्यवहारांत फारसी शब्दांचे प्रमाण कमी कमी होत गेले. इ. राजवाडे यांनी काढलेल्या निष्कर्षानुसार '१२९० पासून १६५६ पर्यंत, म्हणजे शिवाजीचा अंमल सुरू होईपर्यंत' फारसी शब्दाचे मराठीत प्राधान्य होते १६५६ पासुन १७२८ पर्यंत फारसी शब्द जल्दीने कमी होत गेले. [४८]

पत्रव्यवहारातील फारसी शब्दांचे स्तोम कमी करण्याचे श्रेय निश्चितपणे शिवछत्रपतींकडे जाते. 'राज्य व्यवहार कोश'. 'लेखन प्रशस्ती' यांसारख्या ग्रंथांची निर्मिती महाराजांनी विद्वान मंडळींकडून हेतुपुरस्कर करून घेतली. शिवपूर्व कालात

फारसी भाषेचा मराठीवर कशाप्रकारे परिणाम झाला याचे सुबोध विवेचन इ. राजवाडे यांनी केलेले असून केवळ फारसी शब्दच नव्हे तर अनेक उद्‌गार-वाचक शब्द, अव्यये, उभयान्वयी अव्यये, शब्दयोगी अव्यये प्रत्यय यांचाही मराठी भाषेवर फार मोठा परिणाम झाला हे त्यांनी साधार दाखविले आहे.

इ. राजवाडे यांनी फारसी भाषेच्या मध्ययुगातील प्रभावाची तुलना आधुनिक काळातील इंग्रजी भाषेच्या प्रभावाशी केलेली आहे. परक्या भाषेचा पुरस्कार करणे म्हणजे गुलामगिरीचा पुरस्कार करणे असे त्यांचे मत होते. आपली तळमळ व्यक्त करताना इ. राजवाडे लिहितात,''फारशी भाषेचे साम्राज्य झाले असता मराठी वाचविण्याला व वाढविण्याला जे उपाय पूर्वी योजिले गेले तेच उपाय सध्याही योजिले पाहिजेत. भाषेचा संकोच म्हणजे आपल्या हालचालीचा संकोच हे लक्षात घेतले पाहिजे'.[४९] शिवाजी महाराजांच्या पत्रांत व्यक्तींच्या नावापुढे जे प्रत्यय आलेले आहेत त्यांचा इ. राजवाडे यांनी चिकित्सकपणे अभ्यास केलेला आढळतो. क्षत्रियांच्या नावापुढे 'सिंग', 'राऊ', आणि 'जी' यांसारखे प्रत्यय लावण्याची प्रथा होती. उदा. मानसिंग, बाजीराऊ, सर्जेराऊ, शिवाजी, संभाजी इत्यादी' ब्राह्मणांना 'पंत', 'पंडीत' किंवा 'जी' असे प्रत्यय त्यांच्या नावांपुढे लावण्याची प्रथा होती. तर भिक्षुकी करणाऱ्या ब्राह्मणांच्या नावांपुढे 'भट' हा प्रत्यय लावत असत. उदा., मोरोपंत, निळोपंत, रामचंद्रपंत हे ब्राह्मण शिवकालात मंत्रीपदावर होते. सिद्धेश्वर भट, नरसिंह भट, ही मंडळी भिक्षुकी करणारी होती. वैश्यांना 'सेठी' किंवा 'देव', 'देऊ' ही उपपदे लावीत असत. उदा. दामा सेठी, नामदेऊ इत्यादी. शूद्रांच्या नावांपुढे सहसा प्रत्यय नसे. उलट त्यांची नावे विकृत रूपात उच्चारली जात. उदा., सोम्या, हऱ्या, नाऱ्या इत्यादी. स्त्रियांच्या नावापुढे 'देवी', 'बाई', 'आऊ','अवा', 'ई' यांसारखे प्रत्यय लावले जात. उदा., देवलदेवी, सगुणाबाई, सोयराबाई, जिजाऊ, रमाव्वा, जिजाई इत्यादी. ब्राह्मणांची एकेरी नावे ओंकारांत असत. (मोरो, केसो) तर क्षत्रियांची नावे बहुमानार्थी 'जी' हा प्रत्यय लावलेली असत. उदा., नेताजी, तानाजी, बहिरजी इत्यादी. क्षत्रियाप्रमाणे क्षात्रकर्म करणाऱ्या ब्राह्मणांच्या नावापुढे 'जी' हा प्रत्यय लावण्याची प्रथा होती, असे काही उदाहरणांवरून स्पष्ट होते. आबाजी सोनदेव, दादोजीपंत कोंडदेव, आण्णाजी दत्तो इत्यादी. इथे लक्षणीय गोष्ट म्हणजे 'जी' या प्रत्ययापुढे 'पंत' हा आणखी एक प्रत्यय ब्राह्मणांच्या बाबतीत लावला जात असे. उदा. दादोजीपंत, आबाजीपंत, अण्णाजीपंत इत्यादी !



नावाप्रमाणे व्यक्तिंच्या आडनावासंबंधी इ. राजवाडे यांनी चिकित्सा केलेली आहे. त्यांचे सर्वच निष्कर्ष मान्य होण्यासारखे नाहीत. त्यांनी आठव्या खंडात उपप्रस्तावनेमध्ये इ.स. १५४१ व १५५८ या दोन वर्षांचे लेख देऊन शिवकालीन व शिवपूर्वकालीन महाराष्ट्रातील आडनाव पद्धतीवर प्रकाश टाकला आहे.[५०] महाराष्ट्रातील बहुतेक आडनावे व्यवसायावरून किंवा गावावरून पडलेली आढळतात. काही आडनावे तर गोत्रांवरून पडलेली आहेत, तर काही आडनावे राजवाडे यांच्या मताप्रमाणे खोडीवरून व लकबीवरून पडलेली आहेत. देसाई, देशमुख, देशपांडे, कुलकर्णी, पाटील इत्यादी आडनावे वतनांवरून पडलेली आहेत. कारखानीस, सबनीस, चिटणीस, सचिव, अमात्य इत्यादी आडनावे व्यवसायांवरून पडलेली आहेत. मराठयांची ९६ कुळे इतिहासप्रसिद्धध असून ही ९६ आडनावे 'क्षत्रियोन्नति दर्पण' मध्ये दिलेली आहेत. आज्ञापत्रामध्ये शिवाजी महाराजांच्या कार्याचा गौरव करताना,'शाणव कुळीचे मराठे यांचा उद्धार केला.' असे म्हटले आहे.[५१] जातीवरून आणि गावाच्या नावांवरून पडलेली आडनावे किती तरी सांगता येतील. उदा. कोळी, भोई, सोनार, तांबोळी, पालकर, वाडीकर, वावडेकर इत्यादी.

शिवकालामध्ये आणखी एक विशेष आढळतो; तो म्हणजे, ब्राह्मण व मराठे यांच्या नावापाठीमागे राजश्री, राजमान्य इत्यादी उपपदे लावण्याची प्रथा सुरू झाली. मुस्लीम राजवटीत हिंदू व्यक्तिंच्या नावापाठीमागेही 'मेहरबान, आजम' इत्यादी उपपदे लावली जात असत. नावांच्या बाबतीत आणखी एक वैशिष्ट्य आढळते ते म्हणजे काही फारसी नावे हिंदूंनी प्रचारात आणली. उदा., फिरंगोजी, दर्याजी, सुभानजी, सरफोजी इत्यादी.

शिवाजी महाराजांच्या पत्रांचा विचार करतांना इ. राजवाडे यांनी आणखी एक मुद्दा उपस्थित केला आहे. '.... चवथी विचार करण्यासारखी बाब म्हटली म्हणजे गावे, खेडी प्रदेश, नद्यां, प्रांत, तालुके, इलाखे, थडी, देश ह्यांच्या नावांची आहे. मुसलमानांच्या पूर्वी व वेळी ह्यांची नावे कशी होती व ह्यांच्या हद्दी कोठवर होत्या. याचा विचार इतका महत्वाचा आहे की, महाराष्ट्राचा मध्ययुगीन व शिवकालीन इतिहास त्याच्याशिवाय दुर्बोध राहील.'[५२] आठव्या खंडानंतर काही फारसी कागदपत्रे पुढील दोन खंडात प्रकाशित करण्याचा संकल्प सांगून इ. राजवाडे यांनी प्रस्तुत मुद्यांवर सविस्तर लिहिण्याचे आश्वासन दिले. तथापि या महत्वाच्या मुद्यांवर सविस्तर लिहिण्यास इ. राजवाडे यांना सवड मिळाली नसावी असे वाटते. त्यांच्या नंतरही कोण्या अभ्यासकाने

या मुद्दयाच्या संदर्भात चिकित्सा केलेली आढळत नाही. इस्लामी राज्यकर्त्यांनी गावांची व प्रदेशांची नावे बदलली. ही गोष्ट तर सर्वश्रुत आहे. किल्ल्यांची नावे बदलल्याची तर असंख्य उदाहरणे आहेत. किल्ल्याजवळ असलेल्या काही डोंगरांची व टेकड्यांची नावेही बदललेली आढळतात. तथापि नद्यांची नावे मात्र बदललेली आढळत नाहीत. तसा एखादा प्रयत्न केल्याचे माझ्यातरी अभ्यासात कोठे आलेले नाही. शिवकालीन समाजाचा यथासांग व परिपूर्ण इतिहास लिहिण्यासाठी इ. राजवाडे यांनी उपस्थित केलेल्या वरील मुद्यांच्या संदर्भात अभ्यासकांनी विचार करणे अगत्याचे आहे.

शिवाजी महाराजांच्या पत्रांच्या स्वरूपाविषयी व अन्य तांत्रिक बाबींविषयी आवश्यक तो तपशील आतापावेतो देण्याचा प्रयत्न केला आहे. महाराजांच्या उपलब्ध असलेल्या पत्रांवरून त्यांवी राजनीती, धर्मविषयक धोरण, रयतेविषयी दृष्टिकोन, त्यांचे शेतीविषयक धोरण, महसूलव्यवस्था, आर्थिक धोरण, वतनदारांविषयी धोरण, सर्वसामान्य प्रशासन, न्याय इत्यादी बाबींचा विचार यापुढे करावयाचा आहे. अर्थात यांतील प्रत्येक विषयावर सविस्तर व साक्षेपी विचार मांडले जाण्याची नितांत आवश्यकता आहे. शिवाजी महाराजांचे कर्तृत्व केवळ स्वराज्यस्थापनेत आढळत नसून स्वराज्याचे सुराज्यात परिवर्तन करण्यामध्ये आढळते ही गोष्ट त्यांच्याच पत्रांवरून स्पष्ट होण्यासारखी आहे. दि.वि. काळे लिहितात त्याप्रमाणे,'महाराजांनी स्वमुखाने घडविलेले आपल्या उद्योगाचे व चारित्र्याचे हे दर्शन इतरांच्या शतपट विस्ताराच्या विवेचनापेक्षा कितीतरी अधिक सजीव आणि समर्पक ठरेल.'[५३]

स्वराज्यस्थापनेचे ध्येयधोरण निश्चित केल्यानंतर शिवाजी महाराजांना प्रथम निष्ठावान सहकारी जमवावे लागले. मराठ्यांच्या ठायी असलेल्या क्षात्रवृत्तीचा, बाणेदारपणाचा आणि इमानी वृत्तीचा उपयोग स्वराज्यकार्यासाठी व्हावा यासाठी महाराजांना आपल्या सहकाऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करावा लागला. मुघल आणि पठाणांच्या राज्यापेक्षा आपले म्हणजे स्वकीयाचे रयतेच्या हितासाठी, उत्कर्षासाठी व संरक्षणासाठी आहे हे नव्या स्वराज्यानीतीचा आदर्श घालून सिद्ध करावे लागले. महाराजांचे हे कार्य एवढे अलौलिक होते की, रामदासासारख्या समकालीन संताने त्यांच्या कार्याचा गौरव करतांना. 'निश्चयाचा महामेरू। बहुत जनासी आधारू । अखंड स्थितीचा निर्धारू। श्रीमंत योगी ' असे जे म्हटले आहे ते अगदी सार्थ वाटते. शिवाजी महाराजांच्या अनेक पत्रांमधून त्यांनी सहकाऱ्यांचे संघटन कसे केले, परकीय सत्तांची चाकरी करण्यात धन्यता मानणाऱ्या शूर मराठ्यांना स्वराजकार्याचे महत्व कसे पटवून दिले



याची उदाहरणे आढळतात. मालोजी घोरपडे यास महाराजांनी लिहिलेले पत्र (क्र.१६६) या दृष्टीने अभ्यास करण्यासारखे आहे. महाराजांनी व्यकोजी राजेंना लिहिलेली सर्व पत्रे त्यांच्या ध्येयधोरणाची साक्ष देतात. (क्र.१७३, १९१, १९२, १९९).

स्वराज्यकार्यासाठी कार्यकर्त्यांची मजबूत संघटना उभारणे महाराजांना आवश्यक होते. ही संघटना उभारण्यासाठी स्वत: महाराज किती दक्ष होते ते त्यांच्याच पत्रांवरून पहाण्यासारखे आहे. हैबतराव देशमुखाला महाराजांनी लिहिलेले पत्र पहा. (क्र.६२) त्यातील काही वाक्ये महाराज आपल्या सहकाऱ्यांमध्ये केवळ निष्ठाच नव्हे तर प्रेम आणि जिव्हाळा कसे निर्माण करीत याची साक्ष देतात. 'तुम्हास साहेब घरिच्या लेकरासारिखे जाणिती', 'आमच्या इमानावरी आपली मान ठेऊन आम्हापासी येणे' इत्यादी. रूद्रप्पा देसाईस लिहिलेल्या पत्रात 'साहेबकाम उदंड कराल', स्वामीही तुमची हरबाब मदत करवितील' इत्यादी वाक्ये मामनीय आहेत. (पत्र क्र. २००). मराठ्यांचे संघटन करण्यासाठी महाराजांनी विलक्षण चातुर्य दाखविले. कधी चुकलेल्यांना क्षमा करून, कधी संशयग्रस्तांना दिलासा देऊन, कधी भेदरलेल्यांना अभय देऊन, तर कधी इनामाचे आमीष दाखवून वा जप्त केलेले वतन पुन: देण्याची तयारी दाखवून महाराजांनी माणसे जोडली. महाराजांच्या पत्रांपैकी क्र.४८, ५९, ९२, ७२, ९३, १०८ व १२६ ही पत्रे त्या दृष्टीने अभ्यास करण्यासारखी आहेत. पत्र क्र. ७२ मध्ये महाराजांनी केदारजी नाईक खोपड्यांस कौल देतांना चांगले खडसावलेही आहे 'साहेबासी गैर रूजू असावे आणि आपल्या हकास खलल करून घ्यावे हे अकल तुम्हांस कोणे दिधली आहे ?' क्र.५९ ह्या पत्रात तर महाराजांनी आपली रोखठोक वृत्ती स्पष्ट केली आहे. 'तुम्ही आम्हासी इमान वर्ताल तोपर्यंत आम्हीहि तुम्हांसी इमाने वर्तोन तुम्हापासून इमानात अंतर पाडिलिया आमचा इमान नाही.' शरणागताला किंवा पश्चातापदग्ध व्यक्तीला अभय देतांना महाराजही आपल्याला अभिप्रेत असलेल्या स्वराज्यनिष्ठेचे त्याचेकडून आश्वासन घेत. कारण 'स्वराज्यनिष्ठा' आणि 'स्वराज्यकार्य ' हाच तर संघटनाचा मुख्य उद्देश होता. महाराजांनी वतनदारांचा व आपल्या अधिकाऱ्यांचा लहानसहान गुन्हा माफ केलेले आढळतात. तथापि फंदफितुरी, दगाबाजी, बेईमानी करणाऱ्या मराठ्यांना शासन करण्याचे कडक धोरणही त्यांनी स्वीकारलेले होतेच.

शिवाजी महाराज वतनदारी पद्धतीचे विरोधक होते असे एक मत मांडले जाते. पण ते बरोबर नाही. स्वराज्याचा उदय होण्याअगोदर शाही राजवटीत जे वतनदार

परंपरेने आपला हक्क भोगत होते, त्या वतनदारांची वतने महाराजांनी पुढे चालविण्यास अनुज्ञा दिलेली आहे. महाराजांची कितीतरी पत्रे, तीही अस्सल, या विधानास पुष्टी देतील. शं.ना. जोशी यांनी शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड तिसरा या ग्रंथाच्या प्रस्तावनेत महाराजांनी कोणाकोणाची वतने चालविली त्याची यादी देऊन पुढे म्हटले आहे की, '... इतक्यांची इनामे व वतने चालविली असून ह्यातील काही अगदी नवीन शिवाजीने निर्माण केली आहेत.' [१४] महाराजांनी वतनदारी पद्धतीचा पुरस्कार जरी केलेला होता, तरी जुलमी व बेइमानी वतनदारांची मात्र गय केली नाही हेही तितकेच खरे आहे. शिवचरित्र साहित्य खंड ७ च्या प्रस्तावनेत कृ. वा. पुरंदरे यांनी शिवाजी महाराजांच्या वतनदारांविषयीच्या धोरणाची उत्कृष्ट चिकित्सा केली आहे. वतनदार जर स्वराज्यावर निष्ठा ठेवतील आणि रयतेवर जुलूम करणार नाहीत तर अशा वतनदारांना स्वराज्य कार्यात सहभागी करून घेण्याचे धोरण महाराजांनी स्वीकारलेले होते. पुरंदरे लिहितात त्याप्रमाणे,'शिवाजीने वतनदारांतील गुणदोषांचा संपूर्ण अभ्यास करून त्या सबंधीचे आपले धोरण निश्चित केले. वतनदारांतील दोषच तेवढे शिवाजीने विचारात घेतले, त्याला त्यांच्यातील गुणांचा फायदा घेता आला नाही असे नाही; तो त्यांना आमूलाग्र ओळखीत होता.'[१५]

महाराजांच्या वतनदारांविषयीच्या धोरणाची चिकित्सा करताना वा. कृ. भावे लिहितात,'.... सर्व वतने काढून घेण्याचा शिवाजीचा इरादा नव्हताच, उलट तो नवीन वतने देतही होता. कारण त्याने सर्व वतने काढून घेतली असती तर ती एक फार मोठी क्रांती ठरली असती. अशी क्रांती सर्व समाजरचनेची उलथापालथ करणारी असल्यामुळे त्याला ती शक्य नव्हती. आपल्या राज्यकारभाराला वतनदारीपासून व्यत्यय येऊ नये एवढाच त्याचा उद्देश असून तो साध्य करण्यापुरतेच फेरबदल वतनदारी पद्धतीत त्याने केले.[१६] भावे यांनी जी क्रांती म्हटली आहे ती शिवाजी महाराजांना अभिप्रेत नव्हती. मध्ययुगात समाजवादाच्या क्रांतिकारक संकल्पना उदयासच आलेल्या नव्हत्या. वतनांच्या उबेमुळे वतनदार मुजोर व जुलुमी बनतात, स्वार्थासाठी प्रसंगी राज्यकर्त्यांशी बेइमानी करतात असा अनुभव असल्यामुळे महाराजांनी वतनदारी पद्धतीचा तिटकारा केला. वतनदारांना 'स्नेह व दंड यामध्ये निक्षून' ठेवण्याचे धोरण स्वीकारुन महाराजांनी वतनदारांना स्वराज्यकार्यास तर जुंपलेच. पण त्याचबरोबर त्यांचा मुजोरपणा पातळ करण्यासाठी मिरासपट्ट्यासारखे कर बसवून त्यांना गठड्या बांधण्याची व खास सैन्य न बाळगण्याची सक्ती करून



त्यांचा मुजोरपणा बऱ्याच प्रमाणात कमी केला. शिवाजी महाराजांनी वतने व इनामे चालविण्याविषयी अनुज्ञा दिलेली असंख्य पत्रे आहेत. त्यामुळे प्रस्तावनेत पत्रांचे क्रमांक देण्याचे टाळत आहे. पत्रांचे संक्षेप स्वतंत्रपणे दिलेली आहेत. त्यावरून अभ्यासकांना वतने व इनामाविषयी ती नेमकी पत्रे कोणती याचा खुलासा होईल.

शिवाजी महाराजांच्या संपूर्ण प्रशासनव्यवस्थेचा विचार करण्याचे हे स्थळ नव्हे. तथापि प्रशासनव्यवस्थेत महाराजांनी विलक्षण शिस्त व उत्तम कार्यक्षमता कशी निर्माण केली होती याचा विचार करणे आवश्यक आहे. शिवाजी महाराजांना केवळ स्वराज्य स्थापन करावयाचे नव्हते, तर प्रजेला कौल देणारे सुराज्य निर्माण करावयाचे होते याचा उल्लेख प्रारंभी आलेला आहेच. या सुराज्य निर्मितीसाठी महाराजांनी आपल्या अधिकाऱ्यांसाठी, वतनदारांसाठी आणि अन्य सेवकांसाठी आचारसंहिताच तयार केलेली होती. महाराजांच्या अनेक पत्रांतून आचारसंहिता दृग्गोचर होते. शासकीय अधिकाऱ्यांसाठी, कर्मचाऱ्यांसाठी महाराजांनी जी आचारसंहिता कल्पिलेली होती, ती आधुनिक प्रशासनव्यवस्थेलाही मार्गदर्शक ठरणारी आहे. किंबहुना आजच्या शासनकर्त्यांना प्रशासनात माजलेला भ्रष्टाचार, अनैतिकता, कमालीची अकार्यक्षमता, जनतेविषयी नोकरशाहीची उदासीनता व बेफिकीरी यांचे उच्चाटन करावयाचे असेल तर महाराजांच्या आचारसंहितेचा स्वीकार करणे क्रमप्राप्त ठरेल असे म्हणता येईल. ही आचारसंहिता आदर्श मानून स्वत:च्याच वर्तनामध्ये ती पूर्णांशाने महाराजांनी राबविली याचे भानही त्यांच्या कार्याचा अभ्यास करताना ठेवणे आवश्यक आहे. 'यथा राजा तथा प्रजा' ह्या म्हणीचे प्रत्यंतर इतिहासाच्या प्रत्येक कालखंडाने सिद्ध केलेले आहे. महाराजांनी स्वत: सेवकांसाठी निर्माण केलेल्या आचारसंहितेला 'मराठ्यांची इज्जत' हे अतिशय समर्पक नाव दिलेले आढळते. ह्या इज्जतीसाठी महाराजांनी प्राणपणाने लढा दिला, अनेक मोह विकार यांवर मात करून उच्च राजनीतीचा आदर्श घालून दिला आणि त्याचबरोबर आपल्या सहकाऱ्यांकडूनही 'मराठ्यांच्या इज्जतीला ' बट्टा लागू नये अशाच वर्तनाची अपेक्षा केली. शिवाजी महाराजांचा युगपुरूष किंवा समर्थांच्या शब्दांत 'श्रीमान योगी' म्हणून जो उल्लेख केला जातो त्याचे कारण महाराजांनी प्रस्थापित केलेल्या आदर्श व उच्च ('राजनैतिक' आणि सामाजिक व धार्मिकही) मूल्यांमध्ये आढळते.

महाराजांच्या पत्रांपैकी क्रमांक १३५ चे पत्र 'मराठ्यांची इज्जत' कथन करणारी गीताच आहे. इतिहासाचार्य राजवाडे यांनी आठव्या खंडात हे पत्र प्रकाशित केले

असून उपप्रस्तावनेत त्यांनी म्हटले आहे की,‘ ह्या लेखांकातील सर्व शब्द शिवाजीच्या तोंडचे आहेत.  हे पत्र शिवाजीने सांगितले व बाळाजी आवजीने लिहिले.  ह्या पत्राची भाषा कारकूनी नसून साहेबी आहे.  शिपाई लोकांनी अमुक रीतीने का वागावे व अमुक रितीने का वागू नये ह्याची फोड शिवाजीने शिपायांस करून दाखविली आहे. हे पत्र केवळ आज्ञापत्र नाही.  पत्रात जरब अतोनात दाखविली आहे.  परंतु ती शिपायांच्या हिताची आहे असे आतील मजकूर वाचून शिपायांनाही वाटावे असे असा ह्या पत्राचा रोख आहे.’[५७]  प्रस्तुत पत्र शिवाजी महाराजांनी लष्करी छावणीच्या अधिकाऱ्यांना लिहिलेले आहे.  या पत्राच्या संदर्भात ग.ह. खरे  लिहितात,’ चिपळूणास नेहमीपेक्षा लौकर लष्क़राची छावणी पडली व त्याही अगोदर बरेच दिवस महाराजांचे सैन्य त्या बाजूस वावरत होते.  त्यामुळे त्या बाजूच्या सुभ्यातील रसद वगैरे जिन्नस प्राय: सरून गेले.  छावणी पडल्यामुळे सैन्याची व्यवस्था करणे महाराजांस भाग होते. त्याप्रमाणे त्याची व्यवस्था लावलीही.  अर्थात ती अगदी काटेकोर व जुजबी होती. त्यामुळे सैनिकांपासून रयतेस त्रास होण्याचासंभव फार होता.  तसा त्रास होऊ नये एवढ्यासाठी महाराजांनी छावणीच्या अधिकाऱ्यांना पत्र घातले.’[५८]

क्र.१३५ चे पत्र मुळातून संपूर्ण वाचून मनन करण्यासारखे आहे.  महाराजांची रयतेविषयीची तळमळ शब्दाशब्दांतून प्रगट होते.  ‘.. ऐसे करू लागलेत म्हणजे जी कुणबी घर धरून जीवमात्र घेऊन राहिले आहेत तेही जाऊ लागतील.  कितेक उपाशी मराया लागतील.  म्हणजे त्याला ऐसे होईल की मोगल मुलाकात आले त्याहुनही अधिक तुम्ही ! ऐसा तळतळाट होईल !’ रात्री दिव्याची वात उंदीर ओढून नेईल व गरीब बिचाऱ्या कुणब्यांच्या शेतीचे आगीमुळे नुकसान होईल याची चिंता महाराजांनी व्यक्त केली आहे.  प्रजेच्या कल्याणासाठी व संरक्षणासाठी तळमळणारा असा राज्यकर्ता जगाच्या इतिहासात विरळाच.  या पत्राच्या शेवटी महाराजांनी जरब दाखविलेली आहे. ‘ज्यापासून अंतर पडेल, ज्याचा गुन्हा होईल, बदनामी ज्यावर येईल, त्यास, मराठियाची तो इज्जत वाचणार नाही, मग रोजगार कैसा ?  खळक समजो.  जास्ती केल्यावेगळं सोडणार नाही.’

दुर्बल शेतकऱ्यांच्या हितासाठी महाराज किती तळमळीने प्रयत्न करीत असत याची साक्ष पत्र क्र.१६२ वरून मिळते.  प्रभानवल्लीच्या सुभेदारास लिहिलेल्या पत्रात महाराजांनी महसुल अधिकाऱ्यांसाठी आचारसंहिताच सांगितलेली आहे.  ‘ यैसियास चोरी न करावी, इमाने इतबारे साहेब काम करावे’, ‘येक भाजीच्या देठास, तेही मन



न दाखविता रास व दुरूस वर्तणे’, रयेतीचा वाटा रयेतीस पावे आणि राजभाग आपणास येई ते करणे’, ‘रयतेवर काडीचे जाल व गैर केलिया साहेब तुजवर राजी नाहीत येसे बरे समजणे’,  कष्ट करून गावाचा गाव फिरावे’ इत्यादी.  ज्या गरीब शेतकऱ्यांजवळ बैल नाहीत, नांगर नाहीत अशा शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी, त्यांना पोटापुरते धान्य द्यावे अशी सूचनाही महाराजांनी या पत्रात केलेली आहे.

शत्रूच्या हल्ल्याची झळ रयतेला किंचितही पोचू नये त्यासाठी महाराज किती दक्ष असत हे क्र.८१ च्या पत्रावरून स्पष्ट होते. या पत्राच्या संदर्भात दि.वि.काळे लिहितात प्रजेच्या हितासाठी कनवाळूपणे आपल्या हाताखालच्या लोकांना  नीट समजावून दिलेला हा हुकूम आणखी एक वेगळ्याच प्रकारचा महाराजांच्या व्यक्तिमत्वाचा पैलू दाखवतो.  सावधगिरीने न वागले तर आपल्या प्रजेला मोगल कैद करून नेतील आणि मग त्यांच्या यातनांचे पाप आपल्या अधिकाऱ्यांच्या माथ्यावर बसेल.  म्हणून रात्रीचा दिवस करून गावोगाव हिंडून लोकांना सावध करण्याची यातील आज्ञा शायिस्तेखानाची स्वारी आल्यावेळची आहे. ’[५९]  पत्रातील पुढील वाक्ये पहा. ‘ मोगल जे बांद धरून नेतील  त्याचे पाप तुमचा माथी बैसेल ऐसे समजोन गावाचा गाव हिंडोनु रातीचा दिवस करून लोकांची माणसे घाटाखाले जागा असेल तेथे पाठवणे, या कामास एक घडीचा दिरंग न करणे.’

कामामध्ये दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांची महाराज गय करीत नसत.  क्र.१४१ चे पत्र या दृष्टीने पहाण्यासारखे आहे. प्रभावलीच्या सुभेदाराला त्याच्या दिरंगाईबद्दल महाराजांनी केवढी कडक समज दिलेली होती ते या पत्रातील शब्दातून स्पष्ट दिसते. नुकत्याच बांधलेल्या पद्मदुर्ग किल्ल्यावरून सिद्दींशी सामना करण्याची महाराजांची योजना होती.  त्यानुसार त्यांनी दौलतखान व दर्यासारंग या दोघांची नेमणूक केली. मोरोपंत पेशव्याने प्रभावलीच्या सुभेदारास ऐवज व गल्ला पद्मदुर्गाकडे पाठविण्यास हुकूम दिला.  पण सुभेदाराकडून या कामात कुचराई व दिरंगाई झाली.  महाराज लिहितात,‘-- त्यास तुम्ही काही पावले नाही, म्हणोन कळो आले.  त्यावरून अजब वाटले की, ऐसे नादान थ़ोडे असतील!’  पुढील वाक्ये चाबकाच्या फटकाऱ्यासारखी आहेत.  ‘एवढी हरामखोरी तुम्ही कराल’, ’ऐश चाकरास ठाक ठीक केले पाहिजे !’,‘ ब्राह्मण म्हणून कोण मुलाहिजा करू पाहतो ?’  ‘गनिमाचे चाकर, गनीम जालेस, ऐसे जाणून बरा नतीजा तुम्हांस पावेल.   ताकीद असे.’  पत्र क्र. १८९ मध्येही महाराजांनी अधिकाऱ्यांची कानउघाडणी केलेली दिसून येते.